# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

### परिपत्रक

**विषय** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना वैयक्तिक लॅपटॉप खरेदीसाठी कर्ज योजना राबविण्याबाबत...

**संदर्भ** : १. वित्त व लेखा विभाग परिपत्रक जा.क्र. वित्त/२०१४-१५/८८७ दि. ३१.०५.२०१४
२. वित्त व लेखा विभाग परिपत्रक जा.क्र. वित्त/२०१४-१५/९१७ दि. ०३.०६.२०१४
३. वित्त व लेखा विभाग परिपत्रक जा.क्र. वित्त/२०१४-१५/९९९ दि. १६.०६.२०१४
४. वित्त व लेखा विभाग परिपत्रक जा.क्र. वित्त/२०१४-१५/२३२३ दि. २२.०८.२०१४

या परिपत्रकाद्वारे सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने शासनमान्य तसेच विद्यापीठ फंडामधून नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी (वर्ग १ ते ४) वैयक्तिक लॅपटॉप खरेदीसाठी बँक ऑफ बडोदा, सेनापती बापट रस्ता शाखेमार्फत कर्ज योजना राबविण्याचा निर्णय घेतला होता. त्याचप्रमाणे ही कर्ज योजना बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे विद्यापीठ परिसर शाखेमार्फतसुध्दा राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सेवकांना बँक ऑफ बडोदा किंवा बँक ऑफ महाराष्ट्र यापैकी कोणत्याही एका बँकेमार्फत कर्ज योजनेचा लाभ घेता येणार आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार, सदर योजनेचा लाभ २० वर्षे व त्यापेक्षा अधिक कालावधीकरीता शासनमान्य पदाव्यतिरिक्त इतर फंडातून नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांनाही देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अशा शिक्षकांनी आपले अर्ज व कागदपत्रे बँकेकडे सादर करावीत. त्यानंतर बँकेमार्फत कर्जाची पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

Gargote

सीए विद्या कि. गारगोटे,
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१४-१५/२४७७
दिनांक : १० सप्टेंबर, २०१४

**प्रत** : माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी.

१. मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. मा. शाखाप्रमुख,
सर्व प्रशासकीय शाखा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

यांना विनंती की, सदरील परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या नजरेस आणावे.

13/Bhosale/Circular